# 14 फेब्रुवारी

**आजचा सुविचार :**

"मोठी स्वप्ने पाहणारेच मोठी स्वप्ने सत्यात उतरवतात."

**आजचे पंचांग :**

वार – सोमवार

मास - माघ

नक्षत्र – पुनर्वसू

सूर्योदय – सकाळी 7.00 वाजता

सूर्यास्त – सायंकाळी 6.35 वाजता

**आजचे दिनविशेष :**

1. 1881 ला आजच्या दिवशी कोलकत्ता येथे देशातील पहिल्या होमिओपाथिक कॉलेजची स्थापना करण्यात आली.

2. 1924 ला आजच्या दिवशी संगणक बनविणारी कंपनी आयबीएम ची स्थापना करण्यात आली.

3. 2005 ला आजच्या दिवशी यु ट्यूब ची स्थापना करण्यात आली.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Hot – फळ

2) Hotel - फुकट

3) House – ताजे

4) Hospital – औपचारिक

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) चार कीटकांची नावे सांगा.

2) सर्वात लहान दोन अंकी संख्या कोणती?

3) लीप वर्षात किती दिवस असतात?

4) एकूण खंड किती व कोणते?

बोधकथा :

## व्याख्यान

एक विद्वान वक्ता एका अतिशय महत्वाच्या विषयावर तळमळीने भाषण देत होता. मात्र श्रोत्यांची चुळबुळ सुरु होती. काहीजण इकडे बघ तर काहीजण रस्त्यावर खेळणा-या लहानमुलांकडे बघत होते. तेव्हा श्रोत्यांचे आपल्या व्याख्यानाकडे अवधान खेचून आणण्यासाठी वक्त्याने एक गोष्ट सांगायला सुरुवात केली.

कथेची सुरुवात होताच जादूची कांडी फिरल्याप्रमाणे सर्व श्रोते अतिशय सावधपणे गोष्ट ऐकू लागले. वक्ता म्हणाला,'एकदा एक देव, एक पाणसर्प आणि एक चिमणी हे तिघे एकत्रितरित्या प्रवासाला निघाले. चालता चालता त्यांना वाटेत एक नदी लागली. चिमणीने उडून पैलतीर गाठला. पाणसर्प पाण्यातून पोहत पोहत पलीकडे पोहोचला."

बस्स इतकेच असे सांगून वक्त्याने आपले अर्धवट राहिलेले भाषण चालू केले. श्रोते आता जोरजोराने ओरडू लागले," अहो वक्ते महाशय, देवाचे पुढे काय झाले, त्याने कशी काय नदी पार केली. त्या तिघांचे पुढे काय झाले."वक्त्याने शांतपणे उत्तर दिले,"देवच तो; तेव्हा ती नदी पार करून जाण्याचे सामर्थ्य त्याच्याठायी असणे सहाजिकच आहे. तो पाण्यावरूनही चालत गेला असेल किंवा पाण्याला बाजूला सारून जाण्याचीही त्याच्यात होती पण तो अलिकडच्याच तीरावर थांबला. "श्रोत्यांनी मोठ्या उत्कंठेने विचारले की देवाने असे अलिकडेच थांबण्याचे कारण काय. यावर वक्ता म्हणाला," ज्या मूर्खांना महत्वाच्या विषयावरचे असणारे व्याख्यान न आवडता मनोरंजक गोष्टी आवडतात त्या मुर्खांचा विचार करत देव नदीकिनारी बसून आहे. जर तुम्ही या महत्वाच्या विषयाबद्दल माझे विचार ऐकून त्यावर काही उपाय केले व आपल्या राज्याला वाचविले तर देव निश्चित पलीकडच्या तीरावर निघून जाईल" वक्त्याचा चतुरपणा कामी आला व श्रोत्यांनी पुढील व्याख्यान शांतपणे ऐकून घेतले.

तात्पर्य :- काहीवेळेस आपल्या चांगल्या व देशहिताच्या योजना लोकांच्या गळी उतरविण्यासाठी युक्तीप्रयुक्तीचा वापर करावाच लागतो. वर्तमानपत्रातून संग्रहित